सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❏ वर्ष - ४ थे ❏ अंक - ९९ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ मंगळवार दि. २६ मे २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -४

## अमरावतीत रामपुरी कॅम्प परिसरात बिबट्या

# तीन तासांच्या अथक प्रयत्नानंतर बिबट्याचे बछड़े जेरबंद

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

अमरावती शहरातील रामपुरी कॅम्प परिसरात बिबट्या शिरल्याची माहिती समोर आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. अमरावती शहराचे प्रथम नागरिक महापौर श्रीचंद तेजवाणी यांचे चुलत भाऊ याना दुपारी साडे तीन ते चार वाजताच्या सुमारास परिसरात असलेल्या गोदामामध्ये बिबट्या जात असतांना आढळला .





लोकवस्तीच्या भागात बिबट्या आढळल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरात मोठी गर्दी झाली आहे.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी आणि पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिसर बंदोबस्ताखाली ठेवण्यात आला असून नागरिकांना सुरक्षित अंतर राखण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दरम्यान, अमरावतीचे महापौर श्रीचंद तेजवानी तसेच गटनेते चेतन गावंडे यांनीही घटनास्थळी भेट देत परिस्थितीची पाहणी केली. वन विभागाकडून बिबट्याचा शोध घेण्याचे आणि त्याला सुरक्षितरित्या पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत मात्र अजून पर्यंत बिबट्या कोणालाही दिसून आला नाही बंद असलेले सर्व गोदाम उघडून पहिले मात्र बिबट्या आढळून आला नाही सध्या बिबट्याच्या शोध घेण्याच्या युद्ध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे वनविभागाने ड्रोन लावून हि बिबट चा शोध घेण्यात येत आहे-

### अखेर बिबट्याचा बछडा जेरबंद



शहरातील रामपुरी कॅम्प परिसरातील शासकीय देशी दारू दुकानाच्या आवारात आज सायंकाळी बिबट्याचा बछडा दिसून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याने बछडा घाबरून गेला होता.

माहिती मिळताच गाडगेनगर पोलीस तसेच वन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. वन विभागाच्या पथकाला बिबट्याचा बछडा बराच वेळ चकवा देत होता. अखेर मोठ्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर शासकीय दारू दुकानातून बिबट्याच्या बछड्याला जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले.

# राहुल गांधी एक पाकिस्तानी एजंट

## पाकमध्ये बसलेल्या बॉसला खूश करण्यासाठी मोदींविरोधात बोलतात, मंत्री नीतेश राणे यांचा आरोप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई

भाजप नेते तथा मंत्री नीतेश राणे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी



यांच्याविरोधात पुन्हा एकदा गरळ ओकली आहे. राहुल गांधी हे पाकिस्तानी एजंट आहेत. ते पाकमध्ये बसलेल्या आपल्या बॉसला खूश करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात बोलतात, असे ते म्हणालेत. त्यांच्या या टीकेमुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापण्याची शक्यता आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सध्या महागाई, इंधन दरवाढ, नीट पेपरफुटी आदी विविध मुद्यांवरून केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. या प्रकरणी त्यांनी मोदींना चक्क महागाई मानवाची उपमा दिली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री नीतेश राणे यांनी त्यांच्यावर उपरोक्त टीका केली आहे. नीतेश राणे म्हणाले, राहुल गांधी एक पाकिस्तानी एजंट आहेत. ते पाकची भाषा आपल्या तोंडातून बोलतात. पाकला खुश करण्याची सर्व तयारी राहुल गांधी यांची आहे. ते तेथून येणारी स्क्रिप्ट येथे वाचून दाखवतात. पाकिस्तानातील आपल्या मालकाला खूश करण्यासाठी त्यांचा हस्तक राहुल गांधी येथे येतो आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात बोलतो.

### बकरीईदला गोवंशाकडे पाहिले तर मुक्काम तुरुंगात

नीतेश राणे यांनी यावेळी राज्यात अनेक ठिकाणी बकरीच्या मांसाच्या नावाने गोमांसाची खुली विक्री केली जात असल्याचाही आरोप केला. ते या प्रकरणी एमआयएचे नेते वारीस पठाण यांच्यावर निशाणा साधताना म्हणाले, अनेक ठिकाणी बकरीच्या मांसाच्या नावाने गोमांसाची विक्री केली जात आहे. जनावरांची तस्करी सुरू आहे. तुम्हाला तुमच्याच धर्मातील जिहादींना आवर घालता येत नसेल, त्यांनी आमच्या हिंदू राष्ट्रात कसे वागावे हे शिकवता येत नसेल, तर आम्हाला जीआर काढून दंड ठोठावावा लागेल. त्यामुळे बकरीदच्या नावाखाली कुणी आमच्या गो मातेकडे वाकड्या नजरेने पाहिले, तर त्यांचा मुक्काम थेट तुरुंगात असेल.

नीतेश राणे यांनी यावेळी रस्त्यांवर अदा करण्यात नमाजासह कथितपणे शरिया कायदा लागू करण्यावर तुरुंगावासाचाही इशारा दिला.

# ‘कांद्याला प्रति क्विंटल ३ हजार रुपये हमीभाव द्या’

## शेतकरी क्रांती महामोर्चानंतर काँग्रेसची मागणी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नाशिक

कांद्याला सध्या प्रति क्विंटल २००-३०० रुपये एवढा कमी भाव मिळत असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या आजच्या विदारक परिस्थितीस भाजपाचे केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारच जबाबदार आहे, असा हल्लाबोल करत शेतकऱ्यांच्या कांद्याला भरीव हमीभाव मिळाल्याशिवाय काँग्रेस पक्ष व महाविकास आघाडी स्वस्थ बसणार नाही, सरकारला सळो की पळो करून सोडू, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

कांद्याला ३ हजार रुपये हमीभाव मिळावा या मागणीसाठी नाशिक जिल्ह्यातील चांदवड चौफुली येथे महाविकास आघाडीच्या वतीने शेतकरी क्रांती महामोर्चा काढण्यात आला. यावेळी रास्ता रोकोही करण्यात आला. या शेतकरी महामोर्चात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे (श.प.) प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे, शिवसेना (उबाठा) आमदार अंबादास दानवे, आमदार रोहित पवार, खा. शोभाताई बच्छाव, खा. भगरे गुरुजी, नाशिक ग्रामीण जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष भारत



टाकेकर, रमेश कहांडोळे, नाशिक शहर काँग्रेसचे अध्यक्ष बबलू खैरे तसेच महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी आणि शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. रास्ता रोको आंदोलनादरम्यान पोलिसी बळाचा वापर करून नेत्यांना ताब्यात घेतले, मात्र शेतकऱ्यांचा संघर्ष दडपून टाकता येणार नाही. सरकार हमसे डरती है, पुलिस को आगे करती है अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हा खोटारडा माणूस आहे, त्यांनी आजपर्यंत केलेल्या घोषणा कधीच पूर्ण केलेल्या नाहीत. शेतकरी अडचणीत असताना भाजपा सरकार मदत करत नाही. बळीराजाला छळणाऱ्या भाजपा सरकारला खाली खेचल्याशिवाय आता गत्यंतर नाही. काँग्रेस पक्ष व संपूर्ण महाविकास आघाडी शेतकऱ्यांबरोबर असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव मिळाल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# पंतप्रधान मोदी हे धुरंधर, तर टीका करणारे दलिंदर आहेत

## एकनाथ शिंदेंचा हर्षवर्धन सपकाळांवर पलटवार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई- विरोधक पंतप्रधान मोदींवर आरोप करत आहेत, पण मोदीजी खरे धुरंधर आहेत, त्यांच्यावर टीका करणारे हे दलिंदर आहेत, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर पलटवार केला. सपकाळ हे एक-दीड वर्षांपासून प्रदेशाध्यक्ष म्हणून काम करत आहेत, तर नरेंद्र मोदी हे आधी मुख्यमंत्री आणि आता पंतप्रधान म्हणून काम करत असल्याचेही ते म्हणाले.



मुंबईत माध्यमांशी बोलताना एकनाथ शिंदे यांना हर्षवर्धन सपकाळ यांनी केलेल्या टीकेबद्दल विचारण्यात आले. ते म्हणाले, हर्षवर्धन सपकाळ हे जेमतेम एक-दीड वर्षांपासून प्रदेशाध्यक्ष झाले आहेत. पंतप्रधान मोदी हे १३ वर्षे गुजरातचे मुख्यमंत्री होते. १२ वर्षांपासून या देशाचे पंतप्रधान म्हणून काम करत आहेत. त्यांनी देशाला विकासाकडे, आर्थिक महासत्तेकडे नेण्याचे काम केले आहे. आत्मनिर्भर भारत बनवण्याचे काम केले आहे. पंतप्रधानांवर खालच्या दर्जात टीका करणे हे निंदाजनक आहे. मी त्याचा निषेध करतो. त्यांनी ज्यांच्यावर आरोप केला, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी धुरंधर आहेत आणि ज्यांनी आरोप केला आहे, ते खरे दलिंदर आहेत. सूर्यावर थुंकण्याचा प्रकार आहे. १४० कोटी जनता या काँग्रेसला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असे टीकास्त्र शिंदेंनी काँग्रेसवर डागले.

# कांदा कापल्यानंतरही अश्रू येणार नाही, त्यांच्याकडूनच अश्रू ढाळण्याचा प्रयत्न

## कांदा आंदोलनावर देवेंद्र फडणवीसांची टीका; इंधन खरेदीमागेही साठेबाजीचा दावा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६मुंबई - राज्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन आणि इंधन तुटवड्याच्या चर्चेमुळे निर्माण झालेल्या वातावरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी कांदा आंदोलनावरून विरोधकांवर टीका केली, तर दुसरीकडे इंधन साठेबाजी करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेशही दिले. राज्यात पेट्रोल आणि डिझेलची खरेदी अचानक वाढल्याने प्रशासन सतर्क झाले असून, जिल्हाधिकाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

विरोधकांच्या आंदोलनावर निशाणा साधताना मुख्यमंत्री म्हणाले की, काही मंडळी फक्त राजकीय फायदा मिळवण्यासाठी आंदोलन करत आहेत. कांदा कापल्यानंतरही ज्यांच्या डोळ्यात अश्रू येणार नाहीत, तेच आता अश्रू ढाळण्याचा प्रयत्न करत आहेत, असा टोला त्यांनी लगावला. आपल्या सरकारला शेतकऱ्यांच्या अडचणींची जाणीव असून, राज्य आणि केंद्र सरकार संवेदनशीलतेने काम करत असल्याचा दावा त्यांनी केला. १५ रुपयांनी कांदा खरेदीचा निर्णय यापूर्वी कोणी घेतला होता का, हे विरोधकांनी दाखवावं, असे आव्हानही त्यांनी दिले. कांद्याच्या प्रश्नावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारने नुकताच कांदा खरेदी दरात वाढ केल्याची माहिती दिली. केंद्राने खरेदी दरात सुमारे ३.५ रुपयांची वाढ करत तो जवळपास १५ रुपयांपर्यंत नेल्याचे त्यांनी सांगितले. तसेच मोठ्या प्रमाणात कांदा खरेदीही सुरू करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राज्य सरकारने



केंद्राकडे विशेष बैठकीची मागणी केली होती आणि त्यानुसार उद्या सायंकाळी महत्त्वाची बैठक होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांवर दीर्घकालीन उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न या बैठकीत होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, राज्यात इंधन खरेदीत अचानक वाढ झाल्याने सरकार चिंतेत आहे. पेट्रोलच्या मागणीत सरासरीपेक्षा २३ टक्के वाढ झाली असून, डिझेलची मागणी ५२ टक्क्यांनी वाढल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. काही भागात तर इंधन पुरवठा ७० टक्क्यांपर्यंत वाढल्याचे त्यांनी सांगितले. ही वाढ नैसर्गिक नसून काही ठिकाणी साठेबाजी सुरू असल्याचा संशय सरकारला आहे. त्यामुळे पुरवठा विभाग आणि गृह विभागाला संयुक्त कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, राज्यात सध्या इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. मात्र, सोशल मीडियावर पसरलेल्या अफवा आणि भीतीमुळे नागरिक मोठ्या प्रमाणात अतिरिक्त इंधन खरेदी करत आहेत. त्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. ही परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सर्व जिल्हाधिकाऱ्यां ना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोण साठेबाजी करत आहे, कोण अतिरिक्त इंधन खरेदी करत आहे, याचा तातडीने शोध घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

### सरकार ॲक्शन मोडमध्ये

राज्यातील कांदा आंदोलन, वाढती इंधन खरेदी आणि अफवांच्या पार्श्वभूमीवर सरकार आता क्शन मोडमध्ये आले आहे. एका बाजूला शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्रासोबत चर्चा सुरू आहे, तर दुसरीकडे इंधन साठेबाजी रोखण्यासाठी प्रशासनाला सज्ज करण्यात आले आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत राज्यातील राजकीय आणि प्रशासकीय हालचाली आणखी वेगाने घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय ......

# महागाईच्या दुहेरी संकटाचे सावट

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी शेतीसंबंधी दोन महत्त्वाच्या बैठका घेतल्या. त्यातही पहिली राज्यस्तरीय खरीप हंगाम आढावा बैठक होती, तर दुसरी बैठक राज्यस्तरीय बँकर्स समितीची होती. या दोन्ही बैठकीच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांनी हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार शेतीला बसणारा अल निनोचा फटका, कृषी पीक कर्जवाटप आणि शेतकर्यांसमोरील अडचणींवर भाष्य केले. सध्या देश मोठ्या आर्थिक संकटातून जात आहे. आखातातील संघर्षामुळे देश इंधन, खत टंचाईच्या काठावर उभा आहे. भरमसाठ पैसे खर्च करून सरकारला देशवासीयांची इंधन गरज भागवावी लागत असल्याने पंतप्रधान मोदींनी देशवासीयांना काटकसरीचा सल्ला दिलेला आहे. देशात विविध पातळीवर काटकसर सुरू असताना पेट्रोल-डिझेल आणि गॅसचे दर आतापर्यंत दोनदा वाढलेत. यामुळे सर्वसामान्यांच्या दारात महागाई आ वासून उभी आहे. त्यातच अल निनोच्या प्रभावामुळे देशात सरासरीच्या ९२ टक्केच पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने चालू वर्ष भारतासाठी आव्हानात्मक जाणार असल्याचे चित्र आहे. एका अर्थाने भारतीय अर्थव्यवस्थेसमोर महागाईचे दुहेरी संकट उभे ठाकले आहे.*

*अल निनो आणि ला निना या जागतिक हवामानविषयक संकल्पना आहेत, ज्याचा थेट परिणाम जगभरातील आणि विशेषत: भारताच्या हवामानावर अर्थात मान्सूनमुळे तयार होणार्या पावसावर होतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, प्रशांत महासागरातील समुद्राचे पाणी नेहमीपेक्षा जास्त गरम होण्याच्या प्रक्रियेला अल निनो आणि हेच पाणी नेहमीपेक्षा जास्त थंड होण्याच्या प्रक्रियेला ला निना म्हणतात. ला निना देशासाठी फायदेशीर मानला जातो, कारण यामुळे भारतात सरासरीपेक्षा जास्त आणि चांगला पाऊस पडतो. परंतु, अल निनो आपल्यासोबत टेन्शनचे वातावरण घेऊन येतो. अल निनोमुळे तापमान सरासरीपेक्षा अधिक वाढून उन्हाचा कडाका जाणवतो. ज्याची दाहकता सध्या आपण सर्वच जण अनुभवत आहोत. विदर्भ मराठवाड्यात पारा ४७ अंशांवर जाऊन पोहोचला आहे. देशातील अनेक भागांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. त्यामुळेच शेतकर्यांसह सर्वसामान्य पावसाची चातकासारखी वाट बघत असताना अल निनो पाऊस टंचाईचा कटू निरोप घेऊन आला आहे.*

*अल निनोचा थेट संबंध मान्सूनच्या पावसाशी असल्यामुळे भारतीय शेतीवर त्याचे अत्यंत गंभीर आणि दूरगामी परिणाम होण्याची चिन्हे आहेत. उष्णतेच्या लाटांमुळे कृषी उत्पादनाला फटका बसू शकतो. भारत हा शेतीप्रधान देश असल्याने अल निनोमुळे शेतीचे अर्थकारण मोठ्या प्रमाणावर बिघडू शकते. महाराष्ट्राच्या बाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेली माहिती आगामी धोक्याची जाणीव करून देणारी आहे. राज्यात यंदाच्या खरीप हंगामावर अल निनोचे मोठे सावट असून त्यामुळे राज्यात सरासरी ८८ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. त्यातही पश्चिम विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांवर अवर्षणाचे संकट घोंगावत आहे. मध्य पूर्वेतील युद्धामुळे रासायनिक खतांच्या तुटवड्याचा शेतकर्यांना फटका बसू शकतो, अशी भीती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे.भारतातील तांदूळ, कापूस, सोयाबीन, मका, तूर आणि भुईमूग आदी खरीपाची पिके पूर्णपणे मान्सूनच्या पावसावर अवलंबून असतात. पाऊस लांबल्यास पेरण्या खोळंबण्याची किंवा पाऊस लवकर गायब झाल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. आधीच उन्हाच्या तीव्रतेमुळे राज्याच्या ग्रामीण भागात पाणीटंचाईचे गंभीर संकट उद्भवले आहे. आजच्या घडीला राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १ हजार ६५२ तहानलेल्या वाड्यांना ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. राज्यात उन्हाचा कडाका कायम राहिल्यास येत्या काही दिवसात पाणीटंचाईचा सामना करणार्या गावांची आणि वाड्यांची संख्या आणखी वाढू शकते. त्यातच पाऊस कमी झाल्यास नद्या, विहिरी, बोअरवेल आणि धरणांमधील पाणीसाठा लवकर आटून खरीपासोबतच रब्बी पिकांनाही त्याचा फटका बसू शकतो. शेती उत्पादन कमी झाल्यास बाजारात अन्नधान्य, भाज्या, डाळींची आवक कमी होईल. अन्नधान्याच्या किमती वाढल्यास महागाई आणखी भडकू शकते. त्यामुळे यंदाच्या खरीप हंगामात पिकांचे नियोजन आणि पाण्याचे व्यवस्थापन सरकारला करावे लागणार आहे. त्यात नदीजोड प्रकल्प, जलयुक्त शिवारअंतर्गत जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण करणे, शेतकर्यांना वेळेवर मुबलक प्रमाणात बी-बियाणे, खते उपलब्ध करून देणे आवश्यक ठरेल.*

## अमरावतीत रंगणार अद्वैत विदर्भ करंडक एकांकिका स्पधा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

शहरात सात जूनला अद्वैत विदर्भ करंडक एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने अंबानगरीच्या नाट्यरसिकांना मेजवानी मिळणार आहे. जवळपास १२ संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत.

सिपना इंजिनिअरिंग कॉलेजच्या स्व. अरविंदजी लिमये सभागृहात सात जून रोजी सकाळी आठ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. या एकांकिका स्पर्धेत अश्विन कार्तिक, नांदी, मशरूम कट, सखी, कोप, रेषा, स्टार्ट, ओमेगा, द रोड शो, प्रेमातलं लफडं, मी नटी, नामदेव पायरी आदी नाट्यांचे प्रयोग सादर केले जाणार आहेत. या स्पर्धेचा आनंद घेण्याचे आवाहन एम. टी. देशमुख, डॉ. श्याम देशमुख, डॉ. संजीवनी पुरोहित, स्वाती तराळ, विशाल तराळ, प्रा. डॉ. सावन देशमुख, विलास पकडे, तृप्ती मेश्राम, प्रा. रसिका वडवेकर, स्नेहा तराळ, अद्वैत तराळ यांनी केले आहे.

### शिरखेड पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई..

# गोवंश वाहतूक करणारे वाहन पकडले




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६शिरखेड**

अमरावती जिल्ह्यातील शिरखेड पोलीस स्टेशन हद्दीत गोवंशीय जनावरांची निर्दयतेने वाहतूक करणार्‍या वाहनावर पोलिसांनी सिनेस्टाईल धडक कारवाई केली.आज २५ मे रोजी सकाळी ७:३० वाजताच्या सुमारास एमएच ०५ बीजे ०९५५ क्रमांकाची झायलो कार गोवंशीय जनावरांना कोंबून कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती शिरखेड पोलिसांना मिळाली. त्यानुसार लेहगाव चौक येथे नाकाबंदी करण्यात आली.नाकाबंदी पाहताच संबंधित वाहनचालकाने कार राँग साईडने पळवण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग केला असता वाहन रस्त्याखाली उतरून झाडाला धडकले. त्यानंतर चालक पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्याला पकडले.

वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता झायलो कारमधील मागील सीट काढून त्यात ८ गोवंशीय जनावरे पाय व तोंड बांधून निर्दयतेने कोंबून भरल्याचे आढळून आले. सर्व जनावरांची सुटका करून त्यांना गोरक्षण केंद्र, चिंचखेड येथे चारा-पाणी व सुरक्षेसाठी दाखल करण्यात आले.या कारवाईत अंदाजे ७४ हजार रुपये किंमतीची ८ गोवंशीय जनावरे व २ लाख रुपये किंमतीची झायलो कार असा एकूण २ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणी वाहन चालक फाजील अहमद अन्सार अहमद वय २६, रा. नालसाबपुरा, अमरावती याला अटक करण्यात आली.त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.-

# अती उष्णतेमुळे संत्रा-मोसंबीची गळण

### वरुड तालुक्यातील उत्पादकांची मदतीची मागणी





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६वरुड**

तालुक्यातील संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकर्‍यांना यंदा अती उष्णतेचा मोठा फटका बसला असून फळांची मोठ्या प्रमाणात गळण झाल्याने आर्थिक संकट निर्माण झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकर्‍यांना प्रति हेक्टर किमान एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी किसान न्याय हक्क संघर्ष समितीने केली आहे. यावर्षी संत्रा व मोसंबीचा आंबिया बहार चांगला फुटला होता. फळधारणा टिकवून ठेवण्यासाठी शेतकर्‍यांनी खत, औषध फवारणी व इतर व्यवस्थापनावर मोठा खर्च केला. मात्र एप्रिल व मे महिन्यात तापमानाने ४५ ते ४७ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडल्याने झाडांवरील फळांना उष्णतेचा मोठा फटका बसला. परिणामी संत्रा व मोसंबीची मोठ्या प्रमाणात गळण होऊन उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. संत्रा व मोसंबी हेच वरुड तालुक्यातील अनेक शेतकर्‍यांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. घरगुती खर्च, शेतीची गुंतवणूक तसेच सामाजिक कार्ये, या उत्पन्नावरच अवलंबून असतात. त्यामुळे अचानक झालेल्या नुकसानामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून आगामी बहारासाठी खत व फवारणीचा खर्च उचलणेही कठीण झाले आहे. अचानक वाढलेले तापमान ही नैसर्गिक आपत्ती मानून शासनाने नुकसानग्रस्त उत्पादकांना विशेष आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. याबाबत तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार व आमदार यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र पावडे, उपसभापती बाबाराव मांगूळकर, स्वप्नील खांडेकर, वैभव पोतदार, धनंजय बोकडे, गोपाल बोडखे, गुलाब दहीवडे, राम निंभोरकर, अंकुश बोडनसे आदी उपस्थित होते.

## मेळघाटातील प्रतीक कोल्हेकरची आयआयटी रुडकी येथे निवड

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६मेळघाट**



जिल्ह्यातील कुपोषणग्रस्त, अतिदुर्गम आणि प्रामुख्याने आदिवासीबहुल म्हणून ओळख असलेल्या धारणी तालुक्यातील बेरदाबल्डा या दुर्गम आदिवासी गावातील कोरकू समाजाचा विद्यार्थी प्रतीक मिठाराम कोल्हेकर यांची प्रतिष्ठित आयआयटी रुडकी, उत्तराखंड येथे बी. प्लॅन एम. टेक. अभ्यासक्रमाकरिता निवड झाल्याने संपूर्ण मेळघाटासह आदिवासी समाजामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

प्रतीक हा मिठाराम कोल्हेकर व ज्योतीताई कोल्हेकर यांचा सुपूत्र असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्याने यश संपादन केले आहे. मेळघाटातील अनेक गावांमध्ये आजही मूलभूत सुविधा अपुर्‍या आहेत. पाणीटंचाई,रोजगाराचा अभाव, अपुर्‍या शैक्षणिक सुविधा, दुर्गम भौगोलिक परिस्थिती आदी अनेक अडचणींवर मात करीत येथील आदिवासी समाजातील विद्यार्थी शिक्षणाच्या माध्यमातून यशाची नवी उंची गाठत आहेत. प्रतीक यांच्या यशामध्ये आई-वडिलांचे मार्गदर्शन, नातेवाइकांचे सहकार्य, शिक्षकवृंदांचे प्रोत्साहन तसेच समाजातील प्रतिष्ठित नागरिकांचा मोठा वाटा असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय डॉ. मनमोहक कासदेकर तसेच कृणाल कासदेकर यांचे विशेष मार्गदर्शन लाभल्यामुळे पुढील दिशा मिळाली आणि आत्मविश्वास वाढल्याचे प्रतीक याने सांगितले.

# शहरात तोतया कामगार अधिकाऱ्यांचा धुमाकूळ सुरूच

### २० मे रोजी वीटभट्ट्यांवरही काढले फोटो

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती-**

शहरामध्ये तोतया कामगार आयुक्त कार्यालयातील अधिकार्‍यांचा धुमाकूळ सुरूच आहे. वॉटरबॉटल प्लँटवरून एक लाख लुटण्यापूर्वी अशाच पद्धतीची घटना चार दिवसांपूर्वी २० मे रोजी राजापेठ ठाण्याच्या हद्दीत घडली होती. त्याच कार्यालयाचा नामोल्लेख करून एका वीटभट्टीच्या ठिकाणी एका तोतयांच्या पथकाने छायाचित्रेही काढली. राजापेठ पोलिसांनी रविवारी (ता. २४) राजेश दत्तूजी जाधव (वय ३१, रा. कोंडेश्वर मंदिराजवळ, माताखिडकी) यांच्या तक्रारीवरून संशयित संतोष भीमराव कोलटेके (वय ४९, रा. जसापूर, ता. भातकुली), भाऊराव ऊर्फ किशोर किशनराव वाहाने (वय ६५), अजय प्रल्हादराव जांगळे (वय ५५, दोघेही रा. प्रशांतनगर, अमरावती) यांच्यासह एक महिला, अशा चौघा तोतयेगिरी करणार्‍यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शनिवारी (ता. २३) बडनेराहद्दीत खंडेलवालनगर परिसरात वॉटर बॉटलच्या प्लँटवर अभिजित राजाभाऊ आबदेव (वय ४५) यांनाही चौघांनी सील ठोकण्यापासून वाचायचे असल्याचे धमकावून एक लाख १५ हजार रुपये लुटून नेले होते. राजेश दत्तूजी जाधव (वय ३१) यांना, कामगार आयुक्त कार्यालयाचे अधिकारी यांना घेऊन दारव्हा येथे जायचे असा निरोप दिला.

जाधव यांनी संतोष कोलटेकेशी २० मे रोजी संपर्क साधला असता, साडेचार वाजता कल्याणनगर चौकात श्री. जाधव हे पांढर्‍या रंगाच्या एमएच २७ एच ६५५८ क्रमांकाच्या कारजवळ गेले. त्यांना कारचालक व छायाचित्रकार म्हणून तोतयांनी सोबत नेले. २१ फेब्रुवारी रोजी संतोष कोलटेके यांची प्रकृती बरी नसल्याने त्यांनी शासकीय रुग्णालयात दुपारी १२ पर्यंत उपचार घेऊन ते नबाबपुरा येथे गेले. गावातील वीटभट्टीची तपासणी करून राजेश जाधव यांनी फोटो व व्हिडिओ काढायला लावले. कोलटेके यास खोलापुरात सोडल्यावर राजेश जाधव यांनी मजुरीचे दोन हजार, तसेच फोटो व व्हिडिओचे, असे वेगळे पाच हजार मागितले. मात्र त्यांना कोलटेके याने फक्त एक हजार रुपये दिले. पैसे मागितले असता धमकीही दिली, असा आरोप जाधव यांनी राजापेठ ठाण्यात दाखल तक्रारीत केला आहे.

# सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले

## भाजीपाल्यापासून धान्यापर्यंत सारेच महाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती -** जिल्ह्यासह ग्रामीण भागात महागाईचा फटका अधिकच जाणवू लागला आहे. इंधन दरवाढ, वाहतूक खर्चवाढ आणि बाजारातील मागणी-पुरवठ्याच्या असमतोलामुळे भाजीपाल्यापासून धान्यापर्यंत सर्वच वस्तूंचे दर आकाशाला भिडले आहेत. खाद्यतेलांचे दरही तेजीत असून सामान्य ग्राहकांचे बजेट कोलमडत आहे. आठवडी बाजारात मेथी व कोथिंबिरीचे भाव भडकले असून प्रतिजुडी २० ते ४० रुपये आकारले जात आहेत. इतर पालेभाज्या दहा रुपयांवर स्थिर आहेत. फळभाज्यांमध्ये प्रतिकिलो पाच ते १० रुपये वाढ दिसून येत आहे. कांद्याची पात १५-



२० रुपये, पालक, करडई, चाकवत १० रुपये प्रतिजुडी, वांगी ५०-६० रुपये, दोडका ७०-८० रुपये, गवार ६० रुपये, कारली ५०-६० रुपये, टोमॅटो ३०-४० रुपये, कांदा १५-३० रुपये, बटाटा २०-३० रुपये, लसूण १००-१८० रुपये, कोबी १०-२० रुपये, तर फुलकोबी १५-३० रुपये प्रतिकिलो आहे. त्याचप्रमाणे फुले, धान्य, डाळी व तेलाच्या दरातही तेजी आली आहे. त्यामुळे ग्रामीण ग्राहकांवर महागाईचा मोठा ताण दिसून येत आहे.

इंधन दरवाढीचा आणखी झटका इंधन दरवाढीमुळे बाजारपेठेतील महागाई आणखी वाढली आहे. पेट्रोलच्या किंमतीमध्ये ८७ पैशांची आणि डिझेलमध्ये ९१ पैशांची वाढ नोंदली गेली असून, १० दिवसांत ही तिसरी दरवाढ आहे. १५ मे रोजी तीन रुपये आणि १९ मे रोजी ९० पैसे, अशी वाढ झाली होती. त्यामुळे एकूण जवळपास पाच रुपये प्रति लिटरने इंधन महाग झाले आहे. इंधनाचे वाढते दर वाहतूकखर्च वाढवून थेट भाजीपाल्यापासून धान्यापर्यंतच्या दरांवर परिणाम करीत आहेत.

# ‘त्या’ पदाधिकार्‍यावर अद्याप कुठलीच कारवाई नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६तिवसा-** स्थानिक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्रामगृहात एका माजी राजकीय पदाधिकार्‍याने येथील कर्मचार्‍यांना शिवीगाळ करीत आचारसंहिताचे भंग करून चांगलाच धिंगाणा घातल्याचा आरोप करण्यात आला. मात्र प्रशासनाकडून त्या पदाधिकार्‍यावर अद्याप कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे प्रशासनातील अधिकार्‍यांना विधान परिषदेच्या आचारसंहितेचा विसर तर पडला नाही ना, असा सवाल उपस्थित केला जात आहे. विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू असताना देखील तिवसा येथील विश्रामगृहात २३ मे रोजी रात्री एका माजी राजकीय पदाधिकार्‍याने याठिकाणी पार्टीचा आस्वाद घेत येथील कर्मचार्‍यांशी अरेरावी करीत चांगलाच धिंगाणा घातल्याचा प्रकार घडला. या प्रकारामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याने त्या पदाधिकार्‍यावर कारवाईची मागणी केली जात आहे.यामध्ये कारवाई करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याबाबत खुलासा घेऊन तसा अहवाल जिल्हाधिकारी यांना पाठवू. पुढील कारवाई जिल्हाधिकारी करतील. **-डॉ. मयूर कळसे,** तहसीलदार.

## धार्मिक कार्यक्रमाच्या देणगीत १८ लाखांचा अपहार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती-**

धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या देणगीमध्ये १८ लाखांचा अपहार झाल्याचा आरोप तुषार त्र्यंबकराव व्यवहारे (वय ५६) यांनी नांदगावपेठ ठाण्यात दाखल तक्रारीत केला आहे. संशयित वैभव अभय बमरोटवार (वय ४०, रा. अर्जुननगर, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तुषार व्यवहारे हे चार वर्षांपासून टेक्नोक्राप्ट टेक्स्टाइल इंडस्ट्री, मुंबई, मुरबाड येथे उपाध्यक्ष म्हणून काम करीत आहेत. नांदगावपेठ एमआयडीसी परिसरातसुद्धा टेक्नोक्राप्ट टेक्स्टाइल ही शाखा असून, येथे रेडिमेट कपडे व सूत तयार केल्या जाते. कंपनीमध्ये दरवर्षीच दुर्गोत्सव साजरा केल्या जातो. २०२२ ते २०२५ पावेतो येथील वैभव अभय बमरोटवार यांच्याकडेच उत्सवाचा हिशेब होता. २०२४ मध्ये देणगी साठी म्हणून नऊ लाख १९ हजार ५७४ रुपये



इतकी रक्कम जमा करण्यात आली होती. तसेच २०२४ व २०२५ मध्येसुद्धा उत्सवाचा हिशेब व खर्च बमरोटवार यांच्याकडेच होता. परंतु त्यांनी दोन्ही वर्षांचा खर्चाचा हिशेब कंपनीच्या संबंधित विभागाकडे सादर केलेला नाही. त्याने दोन्ही वर्षांत जमा झालेल्या रक्कमेपैकी एकूण १८ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब अंतर्गत चौकशीतून पुढे आली आहे. त्यामुळे कंपनीचे उपाध्यक्ष तुषार त्र्यंबकराव व्यवहारे यांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ ठाण्यात संशयित वैभव अभय बमरोटवार विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# सिटी बसला एक महिन्याचे जीवदान

## कंत्राटदार अटींवर देणार सेवा, प्रवाशांना तात्पुरता दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती–**

महापालिकेच्या आपली बससेवेस महिनाभऱ्याचे जीवदान मिळाले आहे. कंत्राटाची मुदत संपल्याने उद्यापासून शहर बसची चाके थांबणार होती, ती आता एक महिना आणखी चालणार आहेत. महापौर व आयुक्तांच्या उपस्थितीत कंत्राटदारासोबत सोमवारी झालेल्या बैठकीत अटींवर आधारित महिनाभर सेवा सुरू ठेवण्यावर सहमती झाली. यामुळे या सेवेचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांना तूर्तास दिलासा मिळाला आहे. अमरावती शहर बससेवा मात्र मृत्यूपंथाला लागली आहे. शहर बससेवेचा करार संपुष्टात आल्याने कंत्राटदार कंपनीने बससेवा सुरू ठेवण्यास नकार दिल्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला होता. दरम्यान, आज महापौर, महापालिका आयुक्त आणि इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कंत्राटदारासोबत चर्चा करण्यात आली, त्यातून महिनाभऱ्यासाठी ही बससेवा सुरू ठेवण्याचा तूर्तास तोडगा निघाला आहे, पण त्यानंतर काय?, हा प्रश्न अनुत्तरित आहे. गेल्या २० वर्षांत चार कंत्राटदार बदलण्यात आले असले तरी सेवा सुरू होती. महापालिकेस या माध्यमातून अल्प उत्पन्न मिळत असले तरी 'लोककल्याणकारी सेवा', या शीर्षाखाली सेवा अविरत होती. मात्र ही सेवा खंडित होण्याची स्थिती निर्माण झाली होती. सद्यस्थितीत बारा बसेस शहरातील सहा मार्गावर धावत असून दररोज बारा हजार प्रवासी या सेवेचा लाभ घेत आहेत. विद्यमान स्थितीत साहू टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स, या कंत्राटदार कंपनीचा कंत्राट आज २५ मे २०२६ रोजी




संपुष्टात आला आहे. विद्यमान कंत्राटदारास मुदतवाढ देऊन बससेवा सुरू ठेवण्याचा महापालिकेचा प्रयत्न होता, मात्र कंत्राटदाराने सेवा सुरू ठेवण्यास आपण असमर्थ असल्याचे महापालिकेस कळविले होते. ही सेवा चालविताना दरमहा सहा ते सात लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत असून आर्थिक दृष्ट्या ते परवडणारे नसल्याचे कंत्राटदाराचे म्हणणे होते. दरम्यान, महापौर, महापालिका आयुक्त, सत्तारूढ पक्षनेत्यांच्या उपस्थितीत महापालिकेत बैठक पार पडली. कंत्राटदाराने काही मागण्या समोर ठेवल्या. त्यात तोट्याचे कारण समोर केले आहे. बसगाड्यांचा विमा काढण्या साठी मोठा खर्च येणार असल्याने त्याची भरपाई कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला. पण, सध्या विधान परिषदेच्या निवडणुकीची आचारसंहिता असल्याने महापालिकेला निर्णय घेता येत नाही, असे कारण समोर करण्यात आले. अखेर चर्चेनंतर येत्या २५ जूनपर्यंत शहर बससेवा सुरू ठेवण्यास कंत्राटदाराने तयारी दर्शविल्याने तूर्तास संकट टळले आहे. अमरावतीत २००६ मध्ये कंत्राटी तत्त्वावर शहर बससेवा सुरू झाली. त्याआधी शहरात एसटी महामंडळातर्फे बससेवा पुरविण्यात येत होती. गेल्या अनेक वर्षांपासून ही बससेवा शहरातील कष्टकरी, श्रमजीवी वर्गासह विद्यार्थी, नोकरदार व सामान्य नागरिकांसाठी मोलाची ठरली आहे. बैठकीला मनपा आयुक्त वर्षा लढ्ढा, महापौर श्रीचंद्र तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पक्षनेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, परिवहन अधिकारी राजेश अडोकार व कंत्राटदार महेश साहू उपस्थित होते.

### शासन मान्यता नसलेल्या एम.ए. अभ्यासक्रमावरून

# अमरावती विद्यापीठ अडचणीत



## आदिवासी विद्यार्थ्यांना दोन कोटींचे अनुदान वाटप केल्याचा आरोप; चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या लाइफलाँग लर्निंग अँड एक्स्टेन्शन विभागांतर्गत सुरू असलेल्या एम.ए. अभ्यासक्रमामध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आदिवासी आंदोलन कृती समितीने केला आहे. शासनाची अधिकृत मान्यता नसलेल्या अभ्यासक्रमासाठी आदिवासी विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल स्वयं योजना अंतर्गत लाभ वितरित करण्यात आल्याचा गंभीर मुद्दा समोर आला असून, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात जिल्हाधिकारी तसेच आदिवासी आयुक्त कार्यालयाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. समितीच्या निवेदनानुसार, संबंधित एम.ए. अभ्यासक्रम २०११ पासून सुरू असून, त्याला शासन मान्यता नसल्याची माहिती प्रकल्प कार्यालय धारणी यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे. मात्र, असे असतानाही २०११ ते २०२६ या कालावधीत जवळपास ४०० विद्यार्थ्यांना स्वयं योजनेचा लाभ देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या माध्यमातून सुमारे दोन कोटी रुपयांचे अनुदान विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद आहे.दरम्यान, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात ४४ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला होता. त्यापैकी १५ विद्यार्थ्यांनाच स्वयं योजनेचा लाभ देण्यात आला, तर उर्वरित २१ विद्यार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप समितीने केला आहे. काही अधिकाऱ्यांनी हेतुपुरस्सर विद्यार्थ्यांवर अन्याय केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.आदिवासी आंदोलन कृती समितीचे अध्यक्ष अर्जुन युवनाते यांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. तसेच लाभापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना तातडीने योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# अमरावती जिल्ह्यातही इंधन तुटवडा

## ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना डिझेल मिळण्यासाठी अडचणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ मोर्शी**

जिल्ह्यात सद्यःस्थितीत खरीप हंगामातील शेती मशागतीचे कामे सुरू आहे. यावेळी शेतकऱ्यांना ट्रॅक्टर सह अन्य कामांसाठी डिसेलची आवश्यकता भासत आहे. शेतकरी पेट्रोल पंपावर सकाळ पासूनच जातात. मात्र, यावेळी पेट्रोल पंपावर गर्दी, पेट्रोल डिझेलसाठी रांगांच रांगा, डिझेलचा तुटवडा, वेळेवर डिझेल नसणे आदी कारणांमुळे शेतकरी हैराण झाले आहेत. ही समस्या ग्रामीण भागातील सर्वच पेट्रोल पंपावर दिसून येत आहे. त्यामुळे शेतीच्या मशागतीची कामे खोळंबलेली आहे.

विदर्भासह राज्यात अनेक भागांत डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना ताटकळत उभे राहावे लागत आहे. तसेच 'नो स्टॉक'चे फलक पाहून परतावे लागत आहे. बुलडाणा जिल्ह्यात डिझेल तुटवड्याचे चित्र नुकतेच समाजमाध्यमांवर झळकले. अमरावती जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील काही परिसरात इंधन तुटवडा जाणवत असून, डिझेलसाठी शेतकऱ्यांना रात्रभर रांगांमध्ये थांबावे लागत आहे. ग्रामीण भागातील पेट्रोल पंपावर



इंधन नसल्याने ट्रॅक्टर व शेतीची इतर कामे ठप्प झाली आहेत. शेतकरी कॅन आणि ड्रम घेऊनपेट्रोल पंपांवर ठिय्या देऊन आहेत. मात्र, डिझेलचा तुटवडा तसेच वेळेवर स्टॉक नसल्याने शेतकऱ्यांना एका पंपवरून दुसऱ्या पंपवर जावे लागत आहे. मात्रतिथेही आधीच गर्दी असते. अथवा पंप बंद असते. अशा तक्रारी आता शेतकऱ्यांकडून होत आहे.

# यूरिया, डीएपीसाठी शेतकऱ्यांची कसरत

## रेशनिंगमुळे रोष यंदा मागणीपेक्षा कमी साठा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

रासायनिक खतांच्या टंचाईच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या खरीप हंगामात शासनाने रेशनिंग केले असल्याने शेतकऱ्यांना खतांसाठी कसरत करण्याची वेळ आली आहे. युरिया व डीएपीचा विशेषतः तुटवडा असल्याने या खतांचा काळाबाजार वाढण्याचीही शक्यता असून लिंकिंगचा सामना करावा लागणार आहे. पर्यायी खतांचे दर वाढल्याने उत्पादनखर्च वाढणार आहे. पावसाचा अंदाज बघता खत व पर्जन्यमान, या दोन्हींचा परिणाम उत्पादन सरासरीवर पडणार असून घट येण्याची शक्यता कृषितज्ज्ञांनी वर्तविली आहे. दरम्यान, अमरावती जिल्ह्यात ७१ हजार मेट्रिक टन खतांचा पुरवठा कमी झाला आहे. यंदाच्या खरीप हंगामात ६.७७लाख हेक्टर क्षेत्र पेरणीखाली येणार असून त्यानुसार कृषी विभागाने बियाणे व खतांचे नियोजन केले आहे. यंदा एल निनोचा प्रभाव राहणार असून ८६२ मि.मी. वार्षिक पर्जन्यमानाच्या तुलनेत प्रत्यक्ष पर्जन्यमान ८८ टक्क्यांपर्यतच राहण्याचा अंदाज वर्तविष्यात आला आहे. कापूस व तुरीच्या क्षेत्रात वाढ अपेक्षित असून सायोबीनचे क्षेत्र गतवेळी इतकेच राहणार असल्याचे कृषी विभागाच्या अहवालात नमूद आहे.

**खतांची जिल्ह्यातील स्थिती (मे. टन)**

| खतांचा प्रकार | यूरिया | एसएसपी | डीएपी | एमओपी | संयुक्त खते | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर आवंटन | ३८,४०० | ३७,८०० | २४,९०० | ४,००० | ४८,९०० | १,५४, ००० |
| उपलब्ध साठा | ११,४७९ | २३,३८१ | ७६१० | १६६५ | ३९,३३६ | ८३,४७१– |




खरीप हंगामासाठी एक लाख ५४ हजार मेट्रिक टन रासायनिक खतांचे आवंटन मंजूर असून त्यातुलनेत आतापर्यंत ८५ हजार २६९ मेट्रिक टन साठा उपलब्ध झाला आहे. यामध्ये विशेषतः युरिया व डीएपीचा साठा अतिशय कमी आहे. यूरियाचा ३८,४०० मेट्रिक टन साठा मंजूर असताना ११ हजार ४७९ व डीएपीचा २४,९०० पैकी ७६१० मेट्रिक टन साठा उपलब्ध झाला आहे.आहे. शेतकऱ्यांची मागणी व उपलब्ध साठा बघता शासनाने टंचाईच्या पार्श्वभूमीवर या दोन्ही खतांसाठी रेशनिंग केले आहे. युरिया व डीएपीची एकरी एक आणि अधिकतम पाच बॅग देण्याचे शासनाचे आदेश आहेत. या रेशनिंगमुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. पाच एकरांपेक्षा अधिक शेती असलेल्या शेतकऱ्यांना या टंचाईची अधिक झळ पोहोचत आहे.

# श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे गुरूजींना पद्मश्री प्रदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या विचारांचा व कार्याचा वारसा पुढे नेणारे अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस श्री जनार्दन बापुरावजी बोथे गुरूजी यांना सोमवारला नवी दिल्ली येथे पद्मश्री प्रदान करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याप्रमुख उपस्थितीत सोहळा संपन्न झाला. वाशिम जिल्ह्यातील गोगरी गावचे रहिवासी असलेल्या बोथे गुरूजींनी वयाच्या अवघ्या १३ व्या वर्षापासून राष्ट्रसंतांच्या कार्यात स्वतःला वाहून घेतले. त्यांनी आदिवासी व वंचित घटकांसाठी आश्रमशाळा व वसतिगृहे उभारून शैक्षणिक क्रांती घडवली, तसेच राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार आणि ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन केले. हा माझा वैयक्तिक सन्मान नसून, सेवा मंडळाच्या पवित्र कार्याचा आणि तुकडोजी महाराजांच्या विचारांचा गौरव आह, असे यावेळी पद्मश्री बोथे गुरूजी म्हणाले.



# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात चिखलदरा तालुक्यातील गडगाभांडूम प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चिखलदरा**

चिखलदरा तालुक्यातील गडगाभांडूम ग्रामपंचायतने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत प्रथम क्रमांक पटकावत परिसराचा मान उंचावला आहे. ग्रामविकासासाठी राबविण्यात आलेली नियोजनबद्ध कामे, प्रभावी प्रशासन आणि लोकसहभागाच्या बळावर ग्रामपंचायतने हे यश संपादन केले. या यशामागे सरपंच संगीता बेठेकर, उपसरपंच उषा जाधव आणि ग्रामसेवक विवेक राठोड यांचे नेतृत्व व परिश्रम महत्त्वाचे ठरले. ग्रामपंचायतच्या विकासकामांना गती देण्यासाठी सर्व सदस्य, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी एकजुटीने योगदान दिले. सदस्य सूमन सावळकर, उषा चतुर, समोती जावरकर, प्रियांका चिमोटे, फुंडाई चिमोटे, रामा दारसिंबे, छगन धांडे, अनिल धांडे, नंदराम कारंदेकर, हरिचंद जांबकर यांचे कार्य विशेष उल्लेखनीय ठरले. तसेच सामाजिक कार्यकर्ते शालिकराम बेहेकर, प्रभू जाधव, राजू चिमोटे व गणेश सावळकर यांनीही ग्रामविकासा साठी सहकार्य केले. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या परिश्रमांचे हे फलित असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली असून, पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भविष्यातही विकासाची ही परंपरा कायम राखण्याचा निर्धार ग्रामपंचायतने व्यक्त केला आहे.




### देव तारी त्याला कोण मारी या म्हणीची प्रचिती

# घुईखेड परिसरात चंद्रभागा नदीत ३५ फूट खोलात ट्रक कोसळला

## चालकाला साधे खरचटलेही नाही!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६चांदुर रेल्वे–** चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड जवळ सोमवारी (ता. २५) नागपूर – छत्रपती संभाजी नगर हायवेवर घडलेल्या एका भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला असून, या घटनेनंतर श्रद्धा आणि आश्चर्य यांची एकच चर्चा सुरू झाली आहे. चंद्रभागा नदीवरील पुलाचा कठडा तोडून एक भरधाव ट्रक थेट नदीपात्रात कोसळला. या घटनेत चालकाला साधे खरचटलेही नाही! विशेष म्हणजे हा अपघात ज्या ठिकाणी घडला, त्या नदीपात्र परिसरातच श्री संत बेंडोजी महाराज यांच्या संजीवन समाधीच्या पादुकांची आषाढी एकादशीला आरती केली जाते. त्यामुळे अनेक भाविक या घटनेकडे दैवी चमत्कार म्हणून पाहत आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, ट्रक पुलावरून खाली पडताना सुमारे ३० ते ३५ फूट खोल नदीपात्रात कोसळला. अपघात इतका भीषण होता की ट्रकचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. पुलाचा कठडा तुटून ट्रक थेट खाली आदळल्याने घटनास्थळी काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र या भीषण दुर्घटनेत सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे ट्रक चालक पूर्णपणे बचावला. एवढ्या मोठ्या अपघाता त चालकाला साधे खरचटणेही झाले नसल्याने उपस्थित नागरिक आणि ग्रामस्थ आश्चर्यचकित झाले. अपघातानंतर स्वतः चालकानेही माझा जीव वाचला, तो फक्त श्री संत बेंडोजी महाराजांच्या कृपेनेच अशी भावना व्यक्त केली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, भाविक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. अनेकांनी या घटनेला चमत्कारिक बचाव असे संबोधले. श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी स्थळाबद्दल परिसरात मोठी श्रद्धा असून, या ठिकाणी अनेक भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे या अपघातानंतर भक्तांमध्ये अधिक श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, अपघातानंतर स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत ट्रक बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले.

पुलाच्या सुरक्षितते बाबतही आता प्रश्न उपस्थित होत असून, संबंधित विभागाने पुलाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या चमत्कारिक बचावाची चर्चा सध्या संपूर्ण चांदूर रेल्वे तालुक्यात रंगत असून, देव तारी त्याला कोण मारी या म्हणीची प्रचिती घुईखेड येथे आल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

# नितीन धांडे ,गणेश खारकर ,हर्षजीत देशमुख यांच्यासह १० जणांनी केली अर्जाची उचल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

तब्बल आठ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अमरावती विभाग विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ निवडणुकीच्या उमेदवारी अर्ज प्रक्रियेला सोमवार, २५ मेपासून अधिकृत सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी माजी राज्यमंत्री प्रवीण पोटे, कांग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, माजी आमदार विरेंद्र जगताप यांच्यासह आठ जणांनी एकूण १६ उमेदवारी अर्जाची उचल







केल्याने राजकीय वातावरण तापू लागले आहे.तर आज मंगळवारी भाजपा चे शहर अध्यक्ष नितीन धांडे ,गणेश खारकर ,हर्षजीत देशमुख यांच्या सह १० जणांनी अर्जाची उचल केली आहे.

यंदाच्या निवडणुकीत महापालिकेतील आठ तसेच विविध नगरपालिकांतील ३४ स्वीकृत नगरसेवकांना मतदानाचा अधिकार मिळाल्याने या सदस्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे. या मतदारसंघात एकूण ४५३ मतदार असून त्यामध्ये २२६ महिला व २२७ पुरुष मतदारांचा समावेश आहे. त्यामुळे प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार असून राजकीय समीकरणांना वेग आला आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज दाखल करताना सुरक्षेच्या दृष्टीनेही निर्बंध लागू करण्यात आले आहेत. निवडणूक निर्णय अधिकार्यांच्या कक्षाबाहेरील १०० मीटर परिसरात केवळ तीन वाहनांनाच प्रवेश राहणार आहे. तसेच उमेदवारासह फक्त पाच जणांनाच अर्ज दाखल करताना प्रवेश दिला जाणार आहे. उमेदवारी अर्जाची किंमत १०० रुपये निश्चित करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली.

# अमरावतीत पावसाची हजेरी

## उकाड्यापासून नागरिकांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६ अमरावती**

अमरावती शहरासह जिल्ह्यात दीर्घ काळानंतर झालेल्या पावसामुळे नागरिकांना वाढत्या तापमानापासून मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून तीव्र उकाडा आणि तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने नागरिक हैराण झाले होते. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत होता. मात्र अचानक वातावरणात बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि काही भागात जोरदार तर काही ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनीही समाधान व्यक्त केले. उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाल्याचे चित्र दिसून आले. दुसरीकडे शेतकऱ्यांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. उन्हाच्या तीव्र झळांमुळे पिकांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. अशातच झालेल्या पावसामुळे जमिनीतील उष्णता कमी होण्यास मदत झाली आहे पावसाचा अंदाज सांगता येईल पण त्याच्या लहरीपणाचा अंदाज



कोण सांगणार? असा प्रश्न काल सोमवारी रात्री सिंदखेड राजा व देऊळगाव राजा तालुक्यात झालेल्या वादळी पावसाने उपस्थित केला.सिंदखेड राजा तालुक्यातील दामिनीचे थैमान पाहवयास मिळाले. राहेरी बुद्रुक येथे काल सोमवारी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास वीज कोसळून पडून मोटार सायकलस्वार ठार झाला तर त्याचा मित्र गंभीररित्या जखमी झाला. लक्ष्मीकांत भगवान देशमुख (वय ५०) असे मृताचे नाव आहे. गंभीर जखमी झालेल्या बालू रामलाल मगर (वय ४५) यास जालना येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# मारहाणीच्या निषेधार्थ शेतकऱ्याचा तहसील कार्यालयावर आत्महत्येचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अंजनगाव सुर्जी**

अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयात सोमवारी दुपारी मोठी खळबळ उडाली. देवगाव येथील शेतकरी अतुल खारोडे यांनी तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील कमानीवर चढून आत्महत्येचा प्रयत्न केला. गळ्यात दुपट्टा लटकवून त्यांनी आंदोलनात्मक भूमिका घेतल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.पांदण रस्त्याच्या वादातून काही व्यक्तींनी आपल्याला मारहाण केल्याचा आरोप खारोडे यांनी केला आहे. संबंधित प्रकरणात न्याय मिळत नसल्याने आणि प्रशासनाने दखल घेतली नसल्याच्या निषेधार्थ त्यांनी हे टोकाचे पाऊल



उचलल्याचे सांगितले जात आहे.घटनेची माहिती मिळताच पोलीस व महसूल प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. समजूत काढल्यानंतर शेतकऱ्याला सुरक्षित खाली उतरविण्यात आले. या घटनेमुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



# त्रुटी पात्र शाळांना न्याय द्या

## शिक्षक महासंघाची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६ मुंबई :** राज्यातील त्रुटी पात्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वाढीव २० टक्के अनुदान तात्काळ मंजूर करावे, अशी मागणी शिक्षक महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सह संयोजक तथा शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी मंत्रालयात मुख्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. २०२१ च्या शासन निर्णयानुसार शाळांनी सर्व त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव सादर केले होते. त्यानंतर २०२३ मध्ये शासनाने या शाळांना पात्र घोषित केले, मात्र वाढीव अनुदान अद्याप मंजूर झालेले नाही. उच्च न्यायालयाच्या मुंबई व नागपूर खंडपीठानेही १ नोव्हेंबर २०२० पासून वाढीव अनुदान देण्याचे आदेश दिल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. तसेच विदर्भातील उष्णतेचा विचार करून शाळा ३० जूनपासून सुरू करण्याची मागणीही करण्यात आली.

# भर दुपारी मोबाईलवर वाजला धोक्याचा सायरन

## अचानक आलेल्या अलर्टने नागरिक मात्र घाबरले

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २६अमरावती–** दुपारी अचानक मोबाईलवर सायरनसदृश्य अलार्म वाजू लागला आणि काही क्षणांसाठी नागरिक अक्षरशः दचकले. कुणाच्या हातातून मोबाईल पडला, तर कुणी जागीच स्तब्ध झाले. कडक उन्हाच्या तडाख्यात सुरू झालेल्या या अनपेक्षित इशाऱ्याने अनेकांना सुरुवातीला नेमके काय घडले, याचाच अंदाज आला नाही. काहींना वाटले आपला मोबाईल तर हॅक झालेला नाही ना! तर काहींना वाटले आपत्ती व्यवस्थापनाचा तातडीचा संदेश तर नाही ना! मात्र, मोबाईलच्या स्क्रीनवर झळकलेल्या संदेशाने उष्णतेच्या संकटाची गंभीरता अधोरेखित केली.




**नेमका काय होता 'अलर्ट'?–** 'पुढील २४ तासात अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा या जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी तीव्र उष्णतेची लाट येण्याची आणि तुरळक ठिकाणी रात्र उष्ण राहण्याची दाट शक्यता आहे - मंत्रालय मुंबई' असा हा इशारावजा मॅसेज होता. भीषण उष्णतेने आधीच हैराण झालेल्या नागरिकांसाठी हा संदेश धक्कादायक ठरला. विशेष म्हणजे हा अलर्ट मोबाईलच्या सायलेंट मोडमध्येही अनेकांच्या फोनवर मोठ्या आवाजात वाजल्याने नागरिक अधिकच चक्रावून गेले.

**काही काळ गोंधळाचे वातावरण**

दुपारच्या सुमारास अमरावती सह विदर्भातील अनेक भागात तापमान ४४ अंशापलीकडे गेले असताना हा अलर्ट एकाचवेळी हजारो, लाखो मोबाईलवर झळकला. त्यामुळे रस्त्यावर असणाऱ्या, कार्यालयात असणार्या, बँकांमध्ये, बाजारपेठांमध्ये आणि अगदी बैठकीदरम्यानही अचानक वाजलेल्या या इशाऱ्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सुरुवातीला तर काहींच्या हातून मोबाईल पडला, तर अनेकांनी घाईघाईने मोबाईल हातात घेत संदेश वाचण्यास सुरुवात केली. काही नागरिकांना हा 'भूकंप किंवा युद्धाचा इशारा तर नाही ना!' असेही वाटून गेले.

**त्या अलर्टमागे होते हे कारण–** दरम्यान, हवामान खाते आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून उष्णतेच्या लाटेबाबत सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. विदर्भात सोमवारपासूनच 'नवतपा' सुरू झाला आहे आणि नवतपाच्या पहिल्याच दिवशी विदर्भातील अनेक शहरे भारतात उष्णतेच्या यादीत पहिल्या दहा क्रमांकात होती. या काळात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, पुरेसे पाणी प्यावे, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# आगामी पावसाळा, वन्यप्राण्यांचा प्रजनन काळ

# १५ जून ते ३० सप्टेंबर मेळघाट जंगल सफारी बंद

# सर्व सफारी गेट्स बंद ठेवण्याचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ मेळघाट** मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये जंगल सफारीसाठी इच्छूक असलेल्या प्रवाशांसाठी महत्वाची बातमी समोर आली आहे. वन विभागाने आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मेळघाटातील सेमाडोह, चिखलदरा, हरिसाल, शहानूर, नरनाळा आणि इतर सर्व सफारी गेट १५ जून ते ३० सप्टेंबरपर्यंत बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे साडेतीन महिने पर्यटकांना जंगलात सफारीचा आनंद घेऊ शकता येणार नाही.साधारणपणे १५ जूनपासून पावसाळा संपेपर्यंत राज्यातील अनेक व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन बंद करण्यात येते. १ ऑक्टोबरपासून पर्यटनाला पुन्हा सुरूवात होते. येत्या १५ जूनपासून वन विभागाने मेळघाटातील सफारीचे बुकिग बंद केले आहे. संकेतस्थळावर त्याची माहिती मिळते. त्यामुळे आता पर्यटकांना पावसाळा संपेपर्यंत जंगल सफारीसाठी वाट बघावी लागणार आहे. पावसाळ्यात रस्ते खराब होतात. जंगलात वाहने अडकून पडतात. याशिवायवन्यप्राण्यांचाप्रजननकालावधीलक्षात घेऊन वन्यप्राण्यांच्या हालचाली अबाधित ठेवण्यासाठी जंगल सफारी बंद करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे वन विभागातील सूत्रांनी सांगितले.



कच्च्या रस्त्यांमुळे मर्यादापावसाळ्यात वनक्षेत्रातील कच्च्या रस्त्यांवर परिस्थिती अधिकच बिकट होत जाते. वन्यजीव आणि पर्यटकांच्या संरक्षणाचा विचार करून, सफारी उपक्रम तात्पुरते स्थगित करण्यात आले आहेत. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, मुसळधार पावसात जंगलात वाहने चालवणे धोकादायक बनते. अनेक मार्ग निसरडे होतात, नाल्यांमध्ये पाणी साचते आणि दृश्यमानता कमी होते.याच कारणामुळे, दरवर्षी पावसाळ्यात गाभा क्षेत्रातील सफारी बंद ठेवल्या जातात. जर पाऊस सामान्य असेल, तर काहीबफरझोनकिवामर्यादित मार्ग पर्यटकांसाठी खुले राहू शकतात. सतत मुसळधार पाऊस पडल्यास, या भागांतील सफारीदेखील बंद केल्या जाऊ शकतात. वन विभागाने पर्यटकांना सफारी बुक करण्यापूर्वी संबंधित अभयारण्यातून अधिकृत माहिती घेण्याचे आवाहन केले आहे.

विविध जैवविविधतेने परिपूर्ण अशा मेळघाटच्या जंगलात विविध प्राण्यांसह दुर्मिळ झाडे, दऱ्या-खोऱ्यांचा संगम आहे. एकाच ठिकाणी पर्यटकांना असा नैसर्गिक अनुभव देणाऱ्या मेळघाट जंगलात पर्यटकांसाठी जंगल सफारीची सोयही आहे. मेळघाट जंगलात वाघांसह अस्वल, सांबर, रानगवायांसारखे विविध प्रकारचे प्राणी पर्यटकांना अनेकदा दर्शन देतात.सध्या शंभरावर वाघांची संख्या या जंगलात आहे. मेळघाटाचे जंगल विस्तीर्ण आहे. वनविभागाकडून जंगल सफारी मार्गावर दर दोन ते तीनकिमी अंतरावर प्राण्यांसाठी पाणवठ्याची सोय केली आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाणी पिण्यासाठी प्राणी पाणवठ्यांवर येतात. त्या कारणाने उन्हाळ्यात जंगल सफारी दरम्यान प्राणी दिसण्याची दाट शक्यता असते.

# गायीला राष्ट्रीय पशू घोषित करण्यासह गोहत्या कायदा कडक करण्याची मागणी

## काँग्रेस अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रपतींना निवेदन



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती** राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्यांक विभाग, जिल्हा अमरावतीच्या वतीने महामहिम राष्ट्रपतींना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष मुकद्दर खान पठाण यांच्या नेतृत्वात देण्यात आले असून, मोठ्या संख्येने पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

निवेदनात देशात गायीच्या नावावर सुरू असलेले राजकारण आणि निरपराध लोकांवर होत असलेले कथित अत्याचार थांबवण्यासाठी कडक कायदा करण्याची मागणी करण्यात आली आहे. गरीब आणि वंचित घटकांवर अन्याय होऊ नये, यासाठी स्पष्ट व कठोर कायदेशीर तरतूद आवश्यक असल्याचे प्रतिनिधींनी नमूद केले.

प्रतिनिधींनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, अशा वादांना पूर्णविराम देण्यासाठी गायीला राष्ट्रीय पशू घोषित करावे. तसेच जमीयत उलमा-ए-हिंदचे अध्यक्ष मौलाना अरशद मदनी यांनी केलेल्या मागणीला आपण समर्थन देत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, सर्वोच्च न्यायालय आणि सरकार जे काही निर्णय घेईल, त्याचे स्वागत करून संबंधित कायद्याचे काटेकोर पालन केले जाईल, असेही प्रतिनिधी मंडळाने नमूद केले. ही मागणी संविधानाच्या चौकटीत राहून करण्यात आली असून, समाजात शांतता व न्याय प्रस्थापित करणे हाच उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

# कांदा, कर्जमाफी ते डिझेल दरवाढ; बच्चू कडूंचा सरकारला इशारा

## शेतकऱ्यांना न्याय द्या, अन्यथा जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती :**

शिवसेना नेते आ बच्चू कडू यांनी कांदा खरेदी, कर्जमाफी, डिझेल-पेट्रोल दरवाढ, विधान परिषद निवडणूक तसेच पेपरफुटीच्या मुद्द्यावर राज्य व केंद्र सरकारवर जोरदार टीका करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडली. कांदा खरेदीचा निर्णय चांगला असला तरी तो अपुरा असल्याचे सांगत त्यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी देण्याची मागणी केली.कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था आजही बिकटच असल्याचे सांगताना बच्चू कडू म्हणाले की, कांदा खरेदीचा निर्णय योग्य असला तरी उत्पादन खर्च निघत नाही. त्यामुळे राज्य सरकारने शेतकऱ्यांना अतिरिक्त प्रोत्साहन निधी द्यायला हवा. विरोधकांनी कांद्याच्या प्रश्नावर आंदोलन केल्याचे स्वागत करतानाच त्यांनी काँग्रेसवरही निशाणा साधला. सत्तेच्या बाहेर असताना शेतकरी आठवतात आणि सत्तेत आल्यानंतर त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जाते, असे होता कामा नये. काँग्रेसच्या काळातही कांदा उत्पादकांचे हेच हाल झाले होते, असा टोला त्यांनी लगावला.कापसाच्या दराच्या मुद्द्यावरूनही त्यांनी भाजप सरकारला घरचा आहेर दिला. मंत्री गिरीश महाजन यांनी सत्तेबाहेर असताना कापसाला सात ते आठ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव देण्याची मागणी केली होती, मात्र सत्ता आल्यावर ते शांत बसल्याची टीका बच्चू कडू यांनी केली.कर्जमाफीच्या मुद्यावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, कर्जमाफीला आचारसंहितेतून सूट देण्याची गरज नाही. कर्जमाफीची घोषणा आधीच झाली आहे. अर्थसंकल्पात तरतूद झाल्यानंतर त्याला आचारसंहितेचा अडथळा येत नाही, असे ते म्हणाले. तसेच ३१ मे रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी कर्जमाफीचा शासन निर्णय निघावा, अशी मागणी त्यांनी केली. ही योजना देखील अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने आहे. त्यामुळे सरकारने ३१



मेलाच जीआर काढला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.डिझेल-पेट्रोल दरवाढीवर भाष्य करताना बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल आरक्षणाची मागणी केली. सध्या पेरणीचा हंगाम सुरू होणार आहे. ट्रॅक्टर बंद पडता कामा नये. ट्रॅक्टर धारकांना विशेष सवलत दिली पाहिजे. शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल मिळाले पाहिजे आणि त्यांच्यासाठी डिझेल आरक्षित केले पाहिजे. अन्यथा आम्ही जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर मोठे आंदोलन उभारू, असा इशारा त्यांनी दिला. युद्धजन्य परिस्थितीमुळे पेट्रोल दरवाढ झाली असली तरी केंद्र आणि राज्य सरकारने दरवाढ रोखण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.विधान परिषद निवडणुकीवर बोलताना त्यांनी सर्व निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे घेतील आणि आपण त्या निर्णयाशी बांधील राहू असे स्पष्ट केले. माझे काम शिवसेना वाढवणे आणि शिवसैनिक तयार करणे आहे. कोण मंत्री होणार, कोण आमदार होणार याच्याशी आम्हाला घेणेदेणे नाही,असे ते म्हणाले.काँग्रेस नेते सपकाळ यांनी कांद्यासाठी आंदोलन केल्याबद्दल त्यांनी स्वागत केले, मात्र ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता आहे तिथे कांद्याला काय भाव मिळतो, हेही तपासले पाहिजे, असे मत व्यक्त केले. आम्ही शेतकरी आणि दिव्यांगांच्या प्रश्नांशिवाय बोलू शकत नाही, असेही ते म्हणाले.कॉकरोज पार्टी बाबत बोलताना बच्चू कडू यांनी त्या संघटनेला समर्थन दर्शवले. फक्त व्हॉट्सअॅपपुरते मर्यादित न राहता त्यांनी रस्त्यावर उतरून विधायक काम केले पाहिजे. सरकारवर अंकुश ठेवणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. तसेच केंद्र सरकारने त्यांचे अकाउंट हॅक करणे चुकीचे असल्याचे सांगत तरुणांना दडपण्याऐवजी राष्ट्रनिर्माणासाठी पुढे आणले पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.पेपरफुटीच्या मुद्द्यावर बोलताना बच्चू कडू यांनी महाराष्ट्रात लागू झालेल्या कायद्याचा उल्लेख केला. पेपरफुटीविरोधी कायद्या साठी पहिले पत्र मी दिले होते. तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. कर्नाटकनंतर महाराष्ट्रात हा कायदा अधिक मजबुतीने लागू करण्यासाठी प्रयत्न करणार, असे त्यांनी सांगितले.